डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ३२ /२०२६ दि. ०२/०२/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभाग हददीत **पाथर्ली रोडवरील सरोवर बार रेस्टारंट ते साई बाबा मंदीर** दरम्यानच्या रस्त्याचे कॉक्रिटीकरणाचे काम दिनांक ०३/०२/२०२६ रोजी पासुन करण्यात येणार आहे. सदर रस्ता अरूंद असल्याने वाहतुक सुरू ठेवुन काम करणे शक्य नाही. त्यामुळे सदर रस्त्यावरील वाहतुक काम संपेपर्यंत पुर्णपणे बंद करून पर्यायी मार्गाने वाहतुक खालील प्रमाणे अन्य मार्गाने वळविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – डोंबिवली पुर्व येथील पाथर्ली रोडवरून सरोवर बार रेस्टारंट मार्गे साईबाबा मंदीर, एम आय डी सी रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सरोवर बार रेस्टारंट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने डावे वळण घेवुन **बालाजी मंदीर रोडने जिमखाना रोड मार्गे** ईच्छीत स्थळी जातील.

प्रवेश बंद – डोंबिवली पुर्व साईबाबा मंदीर, एम आय डी सी रोडकडुन पाथर्ली रोडकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साई बाबा मंदीर, एम.आय.डी.सी. रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने डावे वळण घेवुन आईस फॅक्टरी मार्गे मानपाडा रोडने अथवा उजवे वळण घेवुन जिमखाना रोड मार्गे बालाजीमंदीर रोड मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दिनांक ०३/०२/२०२६ रोजी पासुन काम पुर्ण होई पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबधीत अधिका–याकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.